# महाराष्ट्र सावकारी (नियमन ) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये आदेश

जा.क्र.जिउनि/सावकारी/अवैध/क १८ आ/७५४/१५
कार्यालयः-जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,
औरंगाबाद दि. १२/२/२०१५.

**वाचाः-** १. श्री.कल्याण सोपानराव सोनवणे ,रा.शिवशंकर कॉलनी,वार्ड क्र.६६,औरंगाबाद व श्री.ईश्वर किसन पैठणे रा.धावडा आणि इतर यांचा अर्ज ११/८/२०१४.
२. या कार्यालयाचे पत्र दि. १२/८/२०१४
३.सहकार अधिकारी श्री.डी.डी.जैस्वाल,प्राधिकृत चौकशी अधिकारी तथा सहकार अधि.श्रे-१,सिल्लोड यांचा चौकशी अहवाल दि.२५/९/२०१४.
४.सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,ता.सिल्लोड यांचा चौकशी अहवाल दिनांक २५/९/२०१४
५.या कार्यालयाची महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत नोटीस दि.१७/१०/२०१४ व २/१२/२०१४
६.अर्जदार यशोदाबाई कचरु दिवटे रा.धावडा ता.सिल्लोड यांचा आर्ज दि.२२/१२/२०१४ व तोंडी/लेखी म्हणने दि.२२/१२/२०१४,३१/१२/१४,९/१/२०१५
७. गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांचे तोंडी/ लेखी म्हणणे दिनांक १७/११/२०१४ व दि.२२/१२/२०१४.

श्रीमती यशोदाबाई कचरु दिवटे,
ता.सिल्लोड — अर्जदार

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD

**विरुध्द**

१. श्री.लक्ष्मण भिका विसपुते — गैरअर्जदार
रा.तळणी, ता.सिल्लोड जि.औरंगाबाद.

२. सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,सिल्लोड
तथा प्राधिकृत अधिकारी.

ज्याअर्थी, वाचा क्र.१ अन्वये श्री.कल्याण सोपानराव सोनवणे ,रा.शिवशंकर कॉलनी,वार्ड क्र.६६,औरंगाबाद, श्री.ईश्वर किसन पैठणे रा.धावडा ता.सिल्लोड आणि इतर यांनी दिनांक ११/८/२०१४ चा अर्ज देवून सदर तक्रारी अर्जात नमूद केले की, गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते , रा.तळणी, ता.सिल्लोड यांनी तळणी परिसरातील धावडा, सिंदेफळ, तळणी, आमठाणा,चारनेरवाडी येथे अवैध सावकारी व्यवहार करुन अनेक शेतक-याच्या जमीनी खरेदी खताव्दारे गहाण घेतल्या त्याची चौकशी करुन जमीनी परत करणे बाबत तक्रारीसोबत तक्रारीतील मजकूर नमूद करून पाच तक्रारदार शेतक-यांचे रूपये १०० चे बाँडवर प्रतिज्ञापत्र सादर केले.

त्यानुसार संदर्भ क्र.२ नुसार या कार्यालयाने सदर तक्रार सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,सिल्लोड यांना देवून अर्जदाराने अर्जांत नमूद केलेल्या सर्व मुद्यांची तक्रारदारास सोबत घेवून महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे नियमाप्रमाणे चौकशी करून अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,सिल्लोड यांनी सदर चौकशी कामी नियुक्त केलेल्या प्राधिकृत अधिकारी यांनी गैरअर्जदाराच्या तळणी, ता.सिल्लोड येथील राहते घरी दिनांक १४/८/२०१४ रोजी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १६

नुसार झडती घेवून झडतीमध्ये सापडलेल्या कागदपत्राआधारे संबंधितांची सखोल चौकशी करून त्यांचा चौकशी अहवाल संदर्भ क्र.३ अन्वये सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,ता.सिल्लोड यांचे कडे सादर केला.सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,सिल्लोड यांनी संदर्भ क्र.४ अन्वये तो चौकशी अहवाल या कार्यालयाकडे सादर केला.सदर अहवालात नमूद केले आहे की, श्री. कल्यान सोपानराव सोनवणे, रा. शिवशंकर कॉलोनी, वार्ड नंबर ६६, औरंगाबाद, व इतर यांनी दिनांक ११/०८/२०१४ च्या तक्रारीत नमुद केले होते की, श्री लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी यांनी धावडा, शिन्देफळ, तळणी,देऊळगांव बाजार, आमठाणा, चारनेरवाडी, तसेच कन्नड तालुक्यातील गणेशपुर, व फुलब्री तालुक्यातील व भोकरदन तालुक्यातील मिळुन १० ते १५ खेडयात १० % ते २०%दरापर्यंत व्याजाने पैसे देऊन चक्रवाढ व्याज लाऊन अव्वाच्या सव्वा रकमा वसुल केल्या व गावातील लोकांच्या जमिनीच्या रजिस्ट्रया करून घेतल्या व गरीब शेतकऱ्याना भुमीहीन केले आहे. त्यामुळे उक्त नमुद सावकाराच्या घरी धाडी टाकल्यास कोऱ्या चेकवर सहया केलेले ५० ते ६० बुक मिळतील व खरेदीखताच्या १०० ते १२५ रजिस्ट्रया मिळतील तसेच संदर्भिय तक्रारीत त्यांनी नमुद केले आहे की, धावडा येथील गरीब मागासवर्गीय शेतकरी श्री. ईश्वर किसन पैठणे यांनी सन २०१३ मध्ये रू.५००००/- प्रति शेकडा व्याजाने रक्कम घेतली व त्यांना चालु वर्षाला पावसामुळे डबल पेरणी करावी लागली त्यामुळे पैशाची अडचन असल्याने त्यांनी परत रू. ५००००/- व्याजानी मागीतले परंतु त्यांनी सांगीतले की, रू.१०००००/- देतो तुझ्या जमिनीची रजिस्ट्री करून दे त्यानी सावकारावर विश्वास ठेऊन दिनांक २८/०७/२०१४ रोजी सर्वे नंबर ४० मधील २ एकर जमिन शासनाचा बाजार भाव रू. ३१३०००/- असल्याने एवढी रक्कम दर्शवुन पुर्ण रक्कम मिळाली असे दर्शवुन कायमचे खरेदी खत करून दिले व सावकारानी आजपर्यंत त्यांना एक रूपयाही दिला नाही. तसेच श्री.पांडुरंग फकिरा जाधव हे पंचायत समितीचे सभापती होते. त्यांनी सावकाराकडुन रू. ७००००/- घेतले होते. त्यापोटी धावडा येथील सर्वे नं. ६२ मधील जमिनीची रजिस्ट्री करून दिली होती. व सावकाराने तगादा लावल्याने त्यांनी दिनांक १८ डिसेंबर २०१३ रोजी विहीरीत उडी घेऊन आत्महत्या केली. तक्रार दिल्यास हि बातमी पेपरमध्ये येईल व अपमान होईल या भितीने तक्रार देण्यांत आलेली नाही. तक्रार अर्जात त्यानी पुढील ९ शेतकरी कर्जदारांचा तपशिल नमुद केलेला आहे.

१. श्री. ईश्वर किसन पैठणे रा.धावडा सर्वे नं. ४० मधील खरेदी खत.

२. श्री. एकनाथ रतन गिरी रा. धावडा यांचे खरेदीखत.

३. श्री. पांडुरंग फकिरा जाधव रा. धावडा यांचे सर्वे नं. ३२ मधील क्षेत्र २ एकर .

४.श्री. ज्ञानेश्वर वामन भांमरे रा.धावडा यांचे सर्वे नं. ७/१ व ७/२ मधील एकुण क्षेत्र ३ एकर ३० गुंठे .

५.श्री. एकनाथ तुकाराम दिवटे रा. धावडा यांचे सर्वे नं. २५ मधील क्षेत्र २ एकर .

६. श्री. नंदु कचरू दिवटे रा. धावडा यांचे सर्वे नं. ६७/१ मधील क्षेत्र ५ एकर १४ गुंठे .

७.श्री. सांडु भोपळे रा. तळणी यांचे क्षेत्र १ एकर १३ गुंठे.

८. श्री. नंदलाल विठ्ठल भोपळे रा. तळणी यांचे क्षेत्र ४ एकर.

९. श्री. बाबुलाल फुलसिंग रा. चारनेरवाडी यांचे क्षेत्र २ एकर.

वरील तपशिल नमुद करून त्यांनी संबंधीत सावकारावर कार्यवाहीची विनंती केलेली आहे. सदर तक्रार अर्जासोबत त्यांनी पुढील प्रमाणे कागदपत्रे जोडलेली आहेत.

१) श्री.ईश्वर किसन पैठणे २)श्री.एकनाथ रतन गिरी ३)श्री. ज्ञानेश्वर वामन भामरे ४)श्री. नंदु कचरू दिवटे ५)श्री.संजय पांडुरंग जाधव या पाच तक्रारदारांनी प्रत्येकी रू. १००/-चे बॉन्डवर दिनांक १२/०८/२०१४ रोजी दिलेली प्रतिज्ञापत्रे .तसेच श्री. ईश्वर किसन पैठणे यांचे गट नंबर ४० मधील जमिनीचे खरेदीखत झेरॉक्स,श्री. एकनाथ रतन गिरी यांचे सर्वे नंबर ३२ मधील जमिनीचे खरेदीखत झेरॉक्स आणि सर्वे ३२,७/१,७/२,२५,६५,२६६,३५४,६६ इत्यादी गटामधील जमिनीचे सातबारा प्रति.

तसेच वरील आशयाची तक्रार श्री. ज्ञानेश्वर वामनराव भामरे, कचरू दिवटे, एकनाथ रतन गिरी, ईश्वर किसन पैठणे व संजय पांडुरंग जाधव सर्व राहणार धावडा यांनी सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था सिल्लोड

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD

यांच्याकडेही दिनांक १३/०८/२०१४ रोजी केलेली असल्याने व या कार्यालयाने संदर्भ क्र.२ अन्वये पाठविलेली तक्रार या दोन्ही तक्रार अर्जाची चौकशी करुन एकत्रीत अहवाल सादर केलेला आहे.

वरील तक्रारीस अनुसरून या कार्यालयाचे पत्रात दिलेल्या सुचना नुसार,प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी दिनांक १४/०८/२०१४ रोजी, पथकासोबत तसेच तक्रारदार श्री. कल्यानराव सोपानराव सोनवणे व एकनाथ रतन गिरी तसेच गावातील उपस्थीत पंचांसमक्ष श्री. लक्ष्मण भिका विसपुते, रा.तळणी, ता. सिल्लोड यांचे तळणी येथील राहते घराची घरझडती घेण्यांत आली. सदर घरझडतीमध्ये पुढील प्रमाणे कागदपत्र व दस्तऐवज चौकशी कामी ताब्यात घेण्यांत आले आहेत.

**<u>कोरे व काही सहया केलेले बॉन्डपेपर</u>**

१. रू. पाच चे १३/०६/१९८२ चे बॉन्डपेपर क्र.५२५३ श्री. मोतीलाल पतिंगा राजपुत रा. देऊळगांव बाजार ता. सिल्लोड यांचे नावाचा अंगठा असलेला कोरा बॉन्डपेपर.

२. श्री. वामन गवनाजी गवळे रा. डोईफोडा यांचे नावाचा सही नसलेला अ.क्र. २२८५ व २२८६ दिनांक १३/०६/१९८९ रू. पाच चे दोन कोरे बॉन्डपेपर.

३. श्री.विठ्ठल तुकाराम कोळी रा. सोयगांव यांचे नावाचा सही असलेला अ.क्र.५७६ दिनांक ०६/०४/१९९१ चा रू. पाच चा कोरा बॉन्डपेपर .

४. श्री. शंकर सुपडु रा. हळदा यांचे नावाचा सही असलेला अ.क्र.११७९ दिनांक ०५/०६/१९९१ चा रू. पाच कोरा बॉन्डपेपर.

५. श्रीमती सोनाबाई हरीबा रा. हळदा यांचे नावाचा अंगठा असलेला अ.क्र. ११७८ दिनांक ०५/०६/१९९१ चा र. पाच चा कोरा बॉन्डपेपर.

६. श्री. लक्ष्मण काळु गवळी रा. हळदा यांचे नावाचा अंगठा असलेला अ.क्र. २९७० दिनांक १३/०९/१९९१ चा रू. पाच चा कोरा बॉन्डपेपर.

७. श्री. कडुबा फकिरा वाघ रा. हळदा यांचे नावाचा सही असलेला अ.क्र. ७०७ दिनांक ३०/०३/१९९३ चा रू. पाच चा कोरा बॉन्डपेपर.

८. श्री. गणेश विठ्ठल भोपळे रा. तळणी यांचा रू. विस चा विना सही असलेला अ.क्र. १०४०३ दिनांक २४/१०/२००३ चा कोरा बॉन्डपेपर सोबत एकुण जमिनीचा दाखला रहिवासी व सातबारा.

९. श्री. बाबुलाल फुलसिंग यांचा अ.क्र १३८ दिनांक २२/०४/२००४ चा विना सही असलेला कोरा बॉन्डपेपर.

१०. श्री. नंदलाल विठ्ठल भोपळे रा.तळणी यांचे अ.क्र. २०४७ दिनांक ०९/१२/२००४ चे रू. विस चा कोरा बॉन्डपेपर विना सही असलेला.

११. श्री.रमाजी जाधव रा. पेंडगाव यांचा अ.क्र. ४७७१ दिनांक ०८/१०/२००८ चा ( ४७७१/१ व ४७७१/२) असे रू. पन्नास चे अंगठा असलेले दोन कोरे बॉन्डपेपर.

१२. श्री. निजामशहा सांडुशहा रा. तळणी यांचे अ.क्र. १०६१ यांचे दिनांक १२/०१/२०११ चे रू. शंभर चा सही नसलेला कोरा बॉन्डपेपर.

**<u>कोरे धनादेश</u>**

१. विजया बँक शाखा अदालत रोड औरंगाबाद या शाखेचे कोर धनादेश क्र. ६२९२४७ ते ६२९२४९,(३) धनादेश इंग्रजी सही असलेले.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD

२. महाराष्ट्र गोदावरी ग्रामिण बँक शाखा घाटनांद्रा या बँकेचे खाते क्रमांक ५५९३ चे कोरे धनादेश क्र. ९०१९५८७ व ९०१९६०(२) धनादेश श्री. श्रावण रामाजी जाधव यांच्या सहीचे.

३. औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सह बँक शाखा आमठाणा या बँकेचे खाते क्र. २५२३ चे कोरे दोन धनादेश क्र. ४०४८५२ व ४०४८५५ श्री.बाजीराव किसन मोरे यांच्या सहीचे.

४. चिखली अर्बन को ऑपरेटिव्ह बँक लि. सिल्लोडचे खाते क्र. ५०१ चे धनादेश क्र. ७६४३९१ व ७६४३७७ दोन धनादेश सदगुरू कृषि सेवा केंद्र तळणी यांनी दिलेले एक कोरा धनादेश व एक रू. १०००००/- चा सहया असलेला

५. वैद्यनाथ अर्बन को ऑपरेटिव्ह बँक लि. शाखा सिल्लोडचा खाते क्र.२३८ चाइंग्रजी सही असलेले दोन धनादेश क्र. ९९९१४४ व ९९९१४५

६. सिध्देश्वर अर्बन को ऑपरेटिव्ह बँक लि शाखा सिल्लोडचे खाते क्र. ६४८ चे इंग्रजी सही असलेले रू. ५००००/- चा धनादेश क्र. ००१७१८

७. आदर्श महिला नगरी सह बँक म सिल्लोड सहया असलेले खाते क्र. २५०८ चे न. ८६४१,८६४२,१८६८०,१८९९२ असे चार धनादेश अ.क्र. दोन पन्नास हजाराचे एक रू. ७००००/- व एक कोरा इंग्रजी सही असलेला.

८. श्री. एकनाथ रतन गिरी यांचे खाते क्र. २१-८२६३ चे सही असलेले कोरे धनादेश क्र. १८९२८१,१८९२८२,१८९२८३,१८९२८४,१८९२८५ व १८९२८६ ते १८९२९० सही नसलेले महाराष्ट्र ग्रामिण बँक शाखा घाटनांद्रा धनादेश

९. श्री.दिवटे नंदु कचरू यांचे औरंगाबाद-जालना ग्रामिण बँकेचे खाते क्र. ३०८७ चे सहया असलेले धनादेश अ.क्र. ७५४७५३ ते ७५४७६० कोरे धनादेश

१०. श्री. माधव आनंदराव वाघमारे यांचे औरंगाबाद जि.म.स बँक शाखा आमठाणा चे खाते क्र. १९६६ चे अ.क्र. ३७३०६१ ते ३७३०६५ चे पाच सहया असलेले कोरे धनादेश व सहया नसलेले अ.क्र. ३७३०६६ ते ३७३०७० चे पाच धनादेश

११. श्री. बाजीराव किसन मोरे यांचे औरंगाबाद जि.म.स बँक शाखा आमठाणा चे खाते क्र. २५२३ चे अ.क्र. ४०४८५६ ते ४०४८६० या नंबरचे सहया असलेले धनादेश

१२. श्री. पी.एफ.जाधव यांचे औरंगाबाद जि.म.स बँक शाखा आमठाणाचे खाते क्र. १०० चे धनादेश अ.क्र. ३०८२२४ ते ३०८२३० सहया असलेले

१३. श्री. पी.डी. सोमवसे यांचे औरंगाबाद जि.म.स बँक शाखा आमठाणाचे खाते क्र. १३४ चे सहया असलेले कोरे धनादेश अ.क्र. ३२९७७५ ते ३२९७८०

१४. श्री. शिवाजी विठ्ठल जाधव यांचे औरंगाबाद जि.म.स बँक शाखा घाटनांद्राचे खाते क्र. ५९३१ चे सहया असलेले धनादेश अ.क्र. २१३०८६ ते २१३०९० कोरे

१५. श्री. रामदास रतन गिरी यांचे औरंगाबाद जि.म.स बँक शाखा आमठाणाचे सहया असलेले खाते क्र. १३४६ चे धनादेश क्र. २३२६२१ ते २३२६३०

१६. श्री. नंथुसिंग धुंगडे यांचे खाते क्र. १६७११५००५८१४१ एच.डी.एफ.सी बँक कोटाराजस्थानाचे धनादेश क्र. ४८५१२६ ते ४८५१३७ सहया असलेले व अ.क्र. ४८५१३८ ते ४८५१५० सहया नसलेले कोरे धनादेश

१७.श्री. रघुनाथ सुस्ते यांचे आदर्श महिला नागरी सह. बँक शाखा सिल्लोड चे खाते क्र. ३०३९ चे रू. १२०००० च रू. २००००० चे धनादेश क्र. १९०२९ व १९०३० सहया असलेले

१८.रघुनाथ एकनाथ राकडे यांचे आदर्श महिला नागरी सह. बँक शाखा सिल्लोड बँकेचे खाते क्र. ३०२८ चे कोरे धनादेश अ.क्र. १९२२४ ते १९२३० सहया असलेले

१९.श्री. बाबुराव शंकर यांचे आदर्श महिला नागरी सह. बँक शाखा सिल्लोड चे खाते क्र.२८५५ चे अ.क्र. २२६४१ ते २२६५० चे सहया असलेले कोरे धनादेश

२०.श्री. चंद्रकांत कचरू दिवटे यांचे आदर्श महिला नागरी सह. बँक शाखा सिल्लोड चे खाते क्र. २८४२ चे कोरे धनादेश अ.क्र. २२५४१ ते २२५५० (एकुण १०)

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD

२१.इंग्रजी सही असलेले व नाव नसलेले आदर्श महिला नागरी सह. बँक शाखा सिल्लोड चे खाते क्र. २७७८ चे सहया असलेले धनादेश अ.क्र.२२३५१ ते २२३६०

२२.श्री. भावलाल फुलसिंग यांचे आदर्श महिला नागरी सह. बँक शाखा सिल्लोड चे खाते क्र. २७४४ चे सहया असलेले धनादेश क्र. २२०६१ ते २२०७०

२३.श्री. ज्ञानेश्वर वामनराव भामरे यांचे आदर्श महिला नागरी सह. बँक शाखा सिल्लोड चे खाते क्र. ८६६ चे सहया असलेले अ.क्र. ९१३६१ ते ९१३७०

**बँक पासबुके**

१. श्री.राजपुत भावलाल फुलसिंग यांचे खाते क्र. २३/२७४४ चे आदर्श महिला नागरी सह. बँक शाखा सिल्लोड
२. श्री.बावस्कर बाबुराव शंकर यांचे खाते २३/२८५५ चे आदर्श महिला नागरी सह. बँक शाखा सिल्लोड
३. श्री.चंद्रकांत कचरू दिवटे यांचे खाते क्र.२३/२८४२ चे आदर्श महिला नागरी सह. बँक शाखा सिल्लोड
४. ज्ञानेश्वर वामनराव भामरे यांचे खाते क्र. ८६६ चे आदर्श महिला नागरी सह. बँक शाखा सिल्लोड
५. श्री.पैठणे ईश्वर किसन यांचे खाते क्र. २७७८ चे आदर्श महिला नागरी सह. बँक शाखा सिल्लोड
६. श्री.गोठवाल बाबुलाल फुलसिंग यांचे औरंगाबाद जालना ग्रामिण बँक शाखा घाटनांद्रा खाते ३८०४ चे

**६ वर्षीय राष्ट्रीय बचतपत्र**

औरंगाबाद हेड ऑफीसचे अ.क्र.५७सिसि ४३०३०२ हया नंबरचे रू. १०००चे श्री. गोठवाल बाबुलाल फुलसिंग यांच्या नावाचे

**नोंदणी घेतलेले सुटे कागद**

१.भावलाल फुलसिंग शिन्देफळ २. दुरध्वनी क्र. असलेला कागद ३. परभत पाटील व इतर यांचे कागद ४. हरचंद सांडु भोपळे ५. श्री. अंबादास शाहुबा पवार ६. प्रकाश भय्या जैस्वाल कोटनांद्रा ७. वामन शंकर माळी ८. श्री. पदमसिंग भाऊ ९. हनुमंता ढोंबरे व इतर १०. नाव नसलेले ११. सुकदेव गोरे घटांब्री १२. श्री. सखाराम पाटील १३. श्री. बनाजी नारायण १४. वामन माळी व इतर १५. बाळु हिंगोळे १६. गणपत सखाराम ठोंबरे १७. मधुकर रंगलाल १८. धनसिंग शितलसिंग व इतर १९. नाव नसलेले.

**नोंदी असलेल्या सात वहया**

१. वही क्र. १ पा.क्र. १ ते ३८०
२. वही क्र. २ पा.क्र. १ ते ४५
३. वही क्र. ३ पा.क्र. १ ते ९५

४. वही क्र. ४ पा.क्र. १ ते १६१

५. वही क्र. ५ पा.क्र. १ ते १८३

६. वही क्र. ६ पा.क्र. १ ते ८९

७. वही क्र. ७ पा.क्र. १ ते १६७

**जनावरांचे दाखले संख्या ३५**

१. काशिनाथ बाळा विसपुते रा. तळणी ता. सिल्लोड
२. आसाराम मोतीराम परदेशी रा. तळणी ता. सिल्लोड
३. भिका विठोबा सोनार रा. तळणी ता. सिल्लोड
४. रामचंद्र धना मेहर रा. रा. तळणी ता. सिल्लोड
५. फकीरचंद आसाराम बेडवाल रा. तळणी ता. सिल्लोड
६. सांडुसिंग शिवलाल भोपळे रा. तळणी ता. सिल्लोड
७. धनसिंग शितळ रा. तळणी ता. सिल्लोड
८. सांडुशा राजुशा रा. तळणी ता. सिल्लोड
९. विठ्ठल सुकराम भोपळे रा. तळणी ता. सिल्लोड
१०. रामभाऊ सांडु ठोंबरे रा. तळणी ता. सिल्लोड
११. आत्माराम सखाराम हळदा रा. हळदा ता. सिल्लोड
१२. नारायण दशरथ रा. देऊळगांव वाडी ता. सिल्लोड
१३. नारायण दशरथ रा. देऊळगांव वाडी ता. सिल्लोड
१४.विकास साहेबराव वाघ रा. तळणी ता. सिल्लोड
१५.भावराव बापु वाघ रा. तळणी ता. सिल्लोड
१६.मार्तड राजाराम ठोंबरे रा. तळणी ता. सिल्लोड
१७.ढवळीराम हिरामन रा. देऊळगांव वाडी ता. सिल्लोड
१८.मार्तड राजाराम ठोंबरे रा. तळणी ता. सिल्लोड
१९.हिरालाल पुणा भोपळे रा. तळणी ता. सिल्लोड
२०.हिरालाल किसन करघे रा. हळदा ता. सिल्लोड
२१.गोविंदा शिवराम रा. तळणी ता. सिल्लोड
२२.पुंडलीक रूपसिंग रा. वांजोळा ता. सिल्लोड
२३.काशिनाथ बाळा रा. तळणी ता. सिल्लोड
२४.आसाराम मोतीराम परदेशी रा. तळणी ता. सिल्लोड
२५.गोविंदा शिवराम वाघ रा. तळणी ता. सिल्लोड
२६.आसाराम मोतीराम रा. तळणी ता. सिल्लोड
२७.खंडु दगडु वाघ रा. तळणी ता. सिल्लोड
२८झिपरू चतरसिंग रा. शिंन्देफळ ता. सिल्लोड
२९मोतीलाल भावलाल भोपळे रा. तळणी ता. सिल्लोड
३०.भावलाल शितल बेडवाल रा. तळणी ता. सिल्लोड
३१.कुतुबुद्दीन मोशद्दीन रा. अंभई ता. सिल्लोड

३२.सिताराम संतुराम रा. देऊळगांव ता. कन्नड

३३.आसाराम मोतीराम रा. तळणी ता. सिल्लोड

३४.किसन धोंडिबा शेळके रा. तळणी ता. सिल्लोड

३५.रामराव भिमाजी तायडे रा. आमठाणा ता. सिल्लोड

**नोंदणीकृत खरेदीखत मुळ व काही झेरॉक्स प्रती.**

१. खरेदी खत क्रमांक ४०४७ दिनांक २८/०७/२०१४ श्री. ईश्वर किसन पैठणे रा. धावडा यांनी करून दिलेले गट नंबर ४० मधील विक्री क्षेत्र ८० आर विक्री किंमती रूपये ३१३०००/-

२. खरेदी खत क्रमांक ४०९९ दिनांक ०५/१२/२००९ श्री. बाजीराव किसन मोरे रा. आमठाणा यांनी करून दिलेले गट नंबर २९१ मधील विक्री क्षेत्र ४० आर विक्री किंमत रू. ६५०००/-

३. खरेदी खत क्रमांक ६४८ दिनांक १३/०२/२०१२ श्री. रवी मदन सोनवणे रा. पिंपरखेड ता. कन्नड यांनी करून दिलेले गट नंबर २९ पैकी विक्री क्षेत्र ३५ आर विक्री किंमत रू. १६२०००/-

४. खरेदी खत क्रमांक २४२ दिनांक २१/०१/२०११ श्री. एकनाथ रतन गिरी रा. धावडा यांनी करून दिलेले गट नंबर ३२ मधील विक्री क्षेत्र २ एकर विक्री किंमत रू. ११६०००/-

५. खरेदी खत क्रमांक ३७९० दिनांक २५/०७/२०११ श्री. लक्ष्मण साळुबा खांडवे रा. गणेशपुर ता. कन्नड यांनी करून दिलेले गट नंबर १८२ मधील विक्री विक्री क्षेत्र १ हेक्टर ४९ आर विक्री किंमत रू. २५००००/-

६. खरेदी खत क्रमांक १०९३ दिनांक १७/०३/२००९ श्री. पांडुरंग फकिरा जाधव रा. धावडा यांनी करून दिलेले गट नंबर ३२मधील विक्री विक्री क्षेत्र २.०० एकर विक्री किंमत रू. १४६०००/-

**७. खरेदी खत क्रमांक २६२४ दिनांक १७/०६/२००९ श्रीमती यशोदाबाई कचरू दिवटे रा. धावडा यांनी करून दिलेले गट नंबर ६४/१ मधील विक्री क्षेत्र १ हेक्टर १९ आर विक्री किंमत रू. १६००००/- झेरॉक्स प्रत**

८. खरेदी खत क्रमांक २४५६ दिनांक ०९/०६/२००९ श्री. बाबु शंकर बावस्तर रा. धावडा यांनी करून दिलेले गट नंबर २८ मधील विक्री क्षेत्र २ एकर विक्री किंमत रू. १०००००/-

९. **खरेदी खत क्रमांक २६२४ दिनांक १७/०६/२००९ श्रीमती यशोदाबाई कचरू दिवटे रा. धावडा यांनी करून दिलेले गट नंबर ६४/१ मधील विक्री क्षेत्र १ हेक्टर १९ आर विक्री किंमत रू. १६००००/-**

१०. खरेदी खत क्रमांक ३१२४ दिनांक २९/०७/२००९ श्री.बाळासाहेब फकिरा जाधव रा. धावडा यांनी करून दिलेले गट नंबर ४९१२ मधील विक्री क्षेत्र १ एकर ३० गुंठे विक्री किंमत रू. ८७०००/-

११. खरेदी खत क्रमांक ४०९८ दिनांक ०५/१२/२००९ श्री. सचिन उत्तम चौधरी रा. आमठाणा यांनी करून दिलेले गट नंबर २९१ मधील विक्री क्षेत्र ८० आर विक्री किंमत रू. १२८०००/-

१२. खरेदी खत क्रमांक २९१५ दिनांक २९/०८/२००८ श्री. एकनाथ तुकाराम दिवटे रा. धावडा यांनी करून दिलेले गट नंबर २५ मधील विक्री क्षेत्र ८० आर विक्री किंमत रू. १५००००/-

१३. खरेदी खत क्रमांक १२७५ दिनांक २२/०३/२००६ श्री. नारायण अमरसिंग राजरवाल व श्री. सुरेश अमरसिंग राजरवाल रा. गणेशपुर ता. कन्नड यांनी करून दिलेले गट नंबर ९१ मधील विक्री क्षेत्र ८० आर विक्री किंमत रू. ८२०००/-

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD

१४.खरेदी खत क्रमांक १६६० दिनांक ०१/०४/२००५ श्री. दौलत बन्सी महेर रा. उपळीवाडी ता.सिल्लोड यांनी करून दिलेले गट नंबर १५१मधील विक्री क्षेत्र ८० आर विक्री किंमत रू. १०२०००/-

१५.खरेदी खत क्रमांक १८६९ दिनांक १२/०४/२००५ श्री. ब्रिजलाल आसाराम बेडवाल रा. तळणी ता.सिल्लोड यांनी करून दिलेले गट नंबर २६६ मधील विक्री क्षेत्र १ हेक्टर ४८ आर विक्री किंमत रू. १०२०००/-

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD

१६.खरेदी खत क्रमांक १९६७ दिनांक १९/०४/२००५ श्री. कचरू संतु भोपळे रा. तळणी यांनी करून दिलेले गट नंबर ३५२ मधील विक्री क्षेत्र ६३ आर विक्री किंमत रू. ८००००/-

१७.खरेदी खत क्रमांक ३१८६ दिनांक १३/०६/२००५ श्री. ज्ञानेश्वर वामनराव भांमरे रा. धावडा यांनी करून दिलेले गट नंबर ७/१ व ७/२ मधील विक्री क्षेत्र १ हेक्टर ३० आर विक्री किंमत रू. १०६०००/-

१८.खरेदी खत क्रमांक ४११७ दिनांक २८/०७/२००५ श्री. किसन बन्सी निबंवाळ रा. गणेशपुर ता. कन्नड यांनी करून दिलेले गट नंबर १७२ मधील विक्री क्षेत्र ८० आर विक्री किंमत रू. ७५०००/-

१९. खरेदी खत क्रमांक ३७४९ दिनांक १२/०७/२००५ श्री.कलदरखाँ सांडुखाँ पठाण रा. देऊळगांव बाजार यांनी करून दिलेले गट नंबर ४३४मधील विक्री क्षेत्र ८० आर विक्री किंमत रू. ८८०००/-

**२०. खरेदी खत क्रमांक ३९७१ दिनांक ०८/०८/२००५ श्रीमती यशोदाबाई कचरू दिवटे रा. धावडा यांनी करून दिलेले गट नंबर ६७ मधील विक्री क्षेत्र ३२ आर विक्री किंमत रू. ३४०००/-**

२१. खरेदी खत क्रमांक ३९७३ दिनांक ०८/०८/२००५ श्रीमती शोभाबाई सोमनाथ वाणी रा. आमठाणा यांनी करून दिलेले गट नंबर ६७ मधील विक्री क्षेत्र ४२ आर विक्री किंमत रू. ४४०००/-

२२.खरेदी खत क्रमांक ३९७२ दिनांक ०८/०८/२००५ श्री.नंदु कचरू दिवटे रा. धावडा यांनी करून दिलेले गट नंबर ६७ मधील विक्री क्षेत्र ३५ आर विक्री किंमत रू. ३७०००/-

२३.खरेदी खत क्रमांक ३९८० दिनांक ०८/०८/२००५ श्री गजानन भावराव वाघ रा. तळणी यांनी करून दिलेले गट नंबर ६७ मधील विक्री क्षेत्र १४ आर विक्री किंमत रू. २९०००/-

२४. खरेदी खत क्रमांक ३९७४ दिनांक ०८/०८/२००५ श्री.चंद्रकांत कचरू दिवटे रा. धावडा यांनी करून दिलेले गट नंबर ६७ मधील विक्री क्षेत्र ९१.१/२ आर विक्री किंमत रू. ९६०००/-

२५. खरेदी खत क्रमांक ३९९७ दिनांक ११/०८/२००५ श्री. कुंजीलाल प्रतापसिंग गोठवाल रा. चारनेरवाडी यांनी करून दिलेले गट नंबर १२ मधील विक्री क्षेत्र ८० आर विक्री किंमत रू. ६५०००/-

२६.खरेदी खत क्रमांक ३९६० दिनांक ०२/०९/२००४ श्री. गणेश विठ्ठल भोपळे रा. तळणी यांनी करून दिलेले गट नंबर ३४१ मधील विक्री क्षेत्र ४० आर विक्री किंमत रू. ३००००/-

२७. खरेदी खत क्रमांक ४१६१दिनांक ३०/०९/२००४ श्री.अयुबशहा बुढनशहारा. शिन्देफळ यांनी करून दिलेले गट नंबर २८२ मधील विक्री क्षेत्र ५५ आर विक्री किंमत रू. ५४०००/-

२८.खरेदी खत क्रमांक ३१०० दिनांक ०९/०७/२००३ श्री. प्रेमसिंग महेताब सोनोत रा. नाचनवेल ता. कन्नड यांनी करून दिलेले गट नंबर ३४१ मधील विक्री क्षेत्र ४० आर विक्री किंमत रू. ४३०००/-

२९.खरेदी खत क्रमांक ३०९९ दिनांक ०९/०७/२००३ श्री. प्रेमसिंग महेताब सोनोत रा. नाचनवेल ता. कन्नड यांनी करून दिलेले गट नंबर ३४१ मधील विक्री क्षेत्र ४० आर विक्री किंमत रू. ४३०००/-

३०.खरेदी खत क्रमांक ३२३६ दिनांक २२/०७/२००३ श्री. ईश्वर महादु भोपळे रा. चारनेर यांनी करून दिलेले गट नंबर १२२ मधील विक्री क्षेत्र २ हेक्टर विक्री किंमत रू. १६२०००/-

३१. खरेदी खत क्रमांक ३६९५दिनांक ०३/१०/२००३ श्री. नंदलाल विठ्ठल भोपळे रा. तळणी यांनी करून दिलेले गट नंबर ३५३ मधील विक्री क्षेत्र १५ आर विक्री किंमत रू. २२०००/-

३२.खरेदी खत क्रमांक ३६९६ दिनांक ०३/१०/२००३ श्री. विठ्ठल सुक्राम भोपळे व श्री. गणेश विठ्ठल भोपळे रा. तळणी यांनी करून दिलेले गट नंबर ३५३ मधील विक्री क्षेत्र १ हेक्टद ७५ आर विक्री किंमत रू. १२४०००/-

३३.खरेदी खत क्रमांक १७८६ दिनांक ०२/०५/२००२ श्री. बाबुलाल फुलसिंग राजपुत रा. चारनेरवाडी यांनी करून दिलेले गट नंबर ६६ मधील विक्री क्षेत्र २ एकर विक्री किंमत रू. ४६०००/-

३४. खरेदी खत क्रमांक ३०८९ दिनांक १२/०७/२००२ श्री. नंदलाल विठ्ठल भोपळे रा. तळणी यांनी करून दिलेले गट नंबर ३५३ मधील विक्री क्षेत्र १ हेक्टर ६० आर विक्री किंमत रू. १०३०००/-

३५.खरेदी खत क्रमांक ३०९० दिनांक १२/०७/२००२ श्री. काशिनाथ दौलत वाघ रा. रा. तळणी ता. सिल्लोड यांनी करून दिलेले गट नंबर ३४६ मधील विक्री क्षेत्र १८/१/२ आर विक्री किंमत रू. १३०००/-

३६.खरेदी खत क्रमांक ३३२५ दिनांक २९/०७/२००२ श्रीमती राधाबाई प्रतापसिंग राजपुत रा. लिहा ता. भोकरदन यांनी करून दिलेले गट नंबर ४०४ मधील विक्री क्षेत्र ६९ आर विक्री किंमत रू. ६२०००/-

३७. खरेदी खत क्रमांक ३७७२ दिनांक १७/१०/२००२ श्री. तुळशिराम परभत मोरे रा. आमठाणा यांनी करून दिलेले गट नंबर २७० मधील विक्री क्षेत्र ३० आर विक्री किंमत रू. ३८०००/-

३८.खरेदी खत क्रमांक ३९९८ दिनांक ११/०८/२००५ श्री. विजय सांडु लव्हाळे रा. चारनेरवाडी यांनी करून दिलेले गट नंबर १२ मधील विक्री क्षेत्र २० आर विक्री किंमत रू. २५०००/-

३९.खरेदी खत क्रमांक ३९२५ दिनांक १५/११/२००२ श्री. सांडुसिंग कचरूसिंग भोपळे रा. तळणी यांनी करून दिलेले गट नंबर ३५४ मधील विक्री क्षेत्र ५३ आर विक्री किंमत रू. ५१०००/-

४०. खरेदी खत क्रमांक २०१९ दिनांक ०४/०४/२००१ श्री. रघुनाथ महादु कवले रा. शिंन्देफळ यांनी करून दिलेले गट नंबर २६५ मधील विक्री क्षेत्र ५६ आर विक्री किंमत रू. ४००००/-

४१.खरेदी खत क्रमांक ३१०० दिनांक २३/०५/२००१ सौ.मंगलाबाई भ्र.शिवलाल सिंगल रा. शिंन्देफळ यांनी करून दिलेले गट नंबर २३७ मधील विक्री क्षेत्र ८० आर विक्री किंमत रू. ४९०००/-

४२.खरेदी खत क्रमांक ४१३७ दिनांक १६/०७/२००१ श्रीमती फैमीदाबी भ्र शौकतखान रा. आमठाणा यांनी करून दिलेले गट नं.११२ मधील विक्री क्षेत्र ८०आर विक्री किंमत रू. ५६०००/-

४३.खरेदी खत क्रमांक १३४२ दिनांक ०२/०३/२००० श्री. एकानाथ सांडु ठोंबरे रा. तळणी यांनी करून दिलेले राहते घर विक्री किंमत रू.१००००/-ग्रामपंचायत अ.क्र.२३६ क्षेत्र २०.२१ चौ.फुट

४४.खरेदी खत क्रमांक ३५३५ दिनांक २१/०५/१९९९ श्री. किसन फकिरा शेकडे रा. हळदा यांनी करून दिलेले गट नंबर ७५ मधील विक्री क्षेत्र ४ हेक्टर विक्री किंमत रू. १३४०००/-

४५.खरेदी खत क्रमांक ४८४८ दिनांक १४/०७/१९९९ श्री. एकानाथ सांडु ठोंबरे रा. तळणी यांनी करून दिलेले राहते घर विक्री किंमत रू. ९०००/-ग्रामपंचायत अ.क्र.२३६ क्षेत्र २१.५६ चौ.फुट

४६.खरेदी खत दुरूस्ती पत्रक क्रमांक १८२१/९७ दिनांक ०५/०४/१९९७ श्री. रमेश शंकर वडगावकर रा. पारध यांनी करून दिलेले गट नंबर ८८ मधील विक्री क्षेत्र ४० आर गाव दुरूस्ती बाबतचे खरेदीखत पारध बु. एवजी पारध खु करणे बाबत.

४७.खरेदी खत दुरूस्ती पत्रक क्रमांक १८२२/९७ दिनांक ०५/०४/१९९७ श्रीमती दगडाबाई देविदास इखनकर रा. पारध बु.यांनी करून दिलेले गाव दुरूस्ती बाबतचे खरेदीखत पारध बु. एवजी पारध खु करणे बाबत.

४८.खरेदी खत झेरॉक्स प्रत क्रमांक २०००/९५ दिनांक १०/०४/१९९५ श्री. गोविंदा शिवराम वाघ रा.तळणी यांनी करून दिलेले गट नंबर ३७६ मधील विहीरीतील पाण्यात व विहीरीत आठ आणे हिस्सा विक्री बाबत विक्री किंमत रू. १००००/-

४९.खरेदी खत झेरॉक्स प्रत क्रमांक २७३८/९५ दिनांक ३०/०६/१९९५ श्री. रमेश शंकरराव वडगावकर रा. पारध बु यांनी करून दिलेले गट नंबर ८८ मधील विक्री क्षेत्र ४० आर विक्री किंमत रू. १९०००/-

५०.खरेदी खत झेरॉक्स प्रत क्रमांक ३१९६/९४ दिनांक १७/०६/१९९४ श्री. विठ्ठल सुखराम भोपळे रा.तळणी यांनी करून दिलेले गट नंबर ३४१ मधील विक्री क्षेत्र ४० आर विक्री किंमत रू. १२०००/-

५१.खरेदी खत क्रमांक ३६२८ दिनांक ११/०६/२००१ श्री. कडुबा बाबुराव वाघ रा. तळणी यांनी करून दिलेले गट नंबर २२० मधील विक्री क्षेत्र ५३आर विक्री किंमत रू.३२५००/-

**उसनवार पावती**

१. बॉन्डपेपर रू. ५ चा अ.क्र. २५७ दिनांक ०७/०६/१९८३ श्री. भावलाल शितल बेडवाल रा. तळणी यांनी करून दिलेले रू. २००००/- उसनवार बाबत.
२. बॉन्डपेपर रू. १० चा अ.क्र. २९६९ दिनांक १३/०९/१९९१ नुसार श्री. लक्ष्मण काळु गवळी रा. हळदा यांनी करून दिलेले रू. १००००/- उसनवार बाबत.
३. बॉन्डपेपर रू. ५ चा अ.क्र. ७०८ दिनांक ३०/०३/१९९३ श्री. कडुबा फकिरा वाघ रा. हळदा यांनी करून दिलेले रू. ६०००/- उसनवार बाबत.
४. बॉन्डपेपर रू. १० ची झेरॉक्स प्रत अ.क्र. ११४ दिनांक १५/०४/१९९९ श्री. जैवंता भागाजी वाघ रा. तळणी यांनी करून दिलेले रू. ४००००/- उसनवार बाबत.

**बॉन्डपेपर कायम खरेदीखत**

१. बॉन्डपेपर रू. १० चा अ.क्र. १७ दिनांक ०३/०४/२००२ श्री. राऊफशहा सांडुशहा रा. तळणी यांनी गट नंबर १ मधील प्लॉट रू.२१०००/-क्षेत्रफळ ३०X३० विक्री बाबत
२. बॉन्डपेपर रू. १०० चा अनुक्रमांक ३१४ दिनांक २८/०७/२००८ वर सौदा पावती श्री. रामदास रतन गिरी रा. धावडा यांचे गट नंबर ६६ मधील क्षेत्र ८० विक्री बाबत विक्री किंमत रू. १५०००/-

३. बॉन्डपेपर रू. १० चा अ.क्र १४१० दिनांक १२/११/२००१ श्री. माणिकराव भावडु भोकरे रा. तळणी यांनी करून दिलेले खरेदीखत जागा मकान क्रमांक ३६१ विक्री किंमत रू. ६२५००/- सोबत सम्मती पत्र सरपंच यांना दिलेले दिनांक १३/११/२००१

४. बॉन्डपेपर रू. १० चा अ.क्र १४११ दिनांक १२/११/२००१ श्री. प्रभाकर भावडु भोकरे रा. तळणी यांनी करून दिलेले खरेदीखत जागा मकान क्रमांक ३६२ विक्री किंमत रू. ६२५००/- सोबत सम्मती पत्र सरपंच यांना दिलेले दिनांक १३/११/२००१

उपरोक्त प्रमाणे गैरअर्जदार यांचे राहते घराची दि.१४/८/२०१४ रोजी चौकशी अधिकारी यांनी केलेल्या घरझडती मध्ये आढळून आलेली कागदपत्र त्यानुसार संबंधित कागदपत्रातील व्यक्तीचे व गैरअर्जदाराचे म्हणणे घेवून चौकशी अधिकारी श्री.जैस्वाल यांचे चौकशीतील निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहे.

उपरोक्त बाबी पाहता सदर प्रकरणी झालेली तक्रार ही गंभीर स्वरूपाची आहे. या प्रकरणात श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांचे राहते घरी घेतलेल्या घरझडतीत बैकायदेशीर सावकारी संबंधाने गंभीर स्वरूपाचे पुरावे सापडलेले आहे. त्यांचे घरी सापडलेल्या नोंदवह्यामध्ये त्यांनी अनेक लोकांशी बेकायदेशीर सावकारी व्यवहार केलेले आहे. लोकांच्या शेतजमिनी त्यांनी परस्पर विक्री केलेल्या आहे. या प्रकरणी तक्रारीचे स्वरूप पाहता अनेक शेतकरी हे त्यांचे बेकायदेशीर सावकारी व्यवहारामुळे त्रस्त झालेले दिसुन येतात या प्रकरणात त्रस्त शेतकऱ्याची आत्महत्या होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उपरोक्त प्रमाणे गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांचे संदर्भाने चौकशी अहवाल प्राप्त नुसार या कार्यालयाने दिनांक २६/९/२०१४ चे पत्रान्वये सहाय्यक निबंधक,ता.सिल्लोड यांना पुढील प्रमाणे गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांचे तळणी येथिल राहाते घरी दि.१४/८/२०१४ रोजीचे झडतीनुसार आढळुन आलेले १) इतर व्यक्तीचे कोरे / सहया असलेले बॉन्ड **-१२** २) इतर व्यक्तीचे कोरे धनादेश **-२३** ३) इतर व्यक्तीचे बँक पासबुक **-६** ४) इतर व्यक्तीचे राष्ट्रीय बचतपत्र **-१** ५) इतर व्यक्तीचे नोंदणी व सुटटे कागद-**१९** ६) नोंदवहया-**७** ७) इतर व्यक्तीचे जनावरांचे दाखले-**३५** ८)इतर व्यक्तीशी केलेले/घेतलेले खरेदीखत **-५१** ९) उसनवार पावती **-४** इत्यादी कागदपत्र आढळुन आलेनुसार प्राधिकृत अधिकारी यांनी केलेल्या चौकशीत गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांनी अवैध सावकारी व्यवसाय केल्याचे स्पष्ट झालेमुळे त्यांच्या विरुध्द महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम २३,३९,४५, उल्लंघण झाले म्हणुन सदर अधिनियमाच्या कलम ४८ अंतर्गत सदर दखलपात्र गुन्हा नोंद करणेसाठी क्षेत्रीय अधिकारी यांना प्राधिकृत करणे बाबत कळविले होते.त्यानुसार गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांच्या विरुध्द अवैध सावकारी केल्याचे स्पष्ट झाल्यामुळे महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ कलम ४८ अतंर्गत कलम २३,३९ व ४५ च्या उल्लघनामुळे गुन्हा क्रमांक II २४/२०१४ दिनांक ३०/९/२०१४ नुसार गुन्हा दाखल झाला आहे.

या प्रकरणात ज्यांचे विरूध्द अवैध सावकारी बाबत तक्रार करण्यांत आलेली आहे, ते श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांचे तळणी, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद येथील राहत्या घराच्या दिनांक १४/०८/२०१४ रोजी घेण्यांत आलेल्या घरझडती मध्ये इतर शेतकऱ्यांचे सहया केलेले व न केलेले कोरे धनादेश, सहया केलेले व न केलेले कोरे बॉन्ड पेपर, व्याजाने कर्जाऊ दिलेल्या रकमांच्या नोंदी असलेल्या ७ नोंद वहया, राष्ट्रीय बचतपत्र, जनावरांचे दाखले व शेतकऱ्यांच्या जमिनीची मुळ खरेदीखते इत्यांदी दस्ताऐवज आढळुन आलेले आहेत.

तसेच ज्यांची खरेदीखते आढळुन आली त्यापैकी अनेक शेतकऱ्यांनी व खरेदीखतांवरील साक्षीदारांनी ती खरेदीखते व्याजाने घेतलेल्या रक्कमेस आड म्हणुन करून दिल्याचे त्यांचे लेखी जवाबात लिहुन दिलेले आहे. तसेच ५ प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांनी श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांचेकडुन कर्ज घेऊन त्यांना जमिनीचे खरेदीखत करून दिले व त्या शेतकऱ्यांनी कर्जाची व्याजासह परत फेड केल्या नंतर श्री. विसपुते यांनी त्यांच शेतकऱ्यांनाअथवा त्या शेतकऱ्याच्या कुटुंबातील सदस्यांना त्याच जमिनी पलटवुन देण्या बाबतचे खरेदीखत करून दिलेले असल्याचेही सिध्द झालेले आहे. तसेच सदर तक्रार अर्जात उल्लेख असलेले काही शेतकरी व त्यांच्या खरेदीखतावरील साक्षीदारांनी प्रत्येकी रू. १०० च्या बॉन्डवर श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांनी व्याजाने पैसे दिल्या बाबतची शपथपत्रे सादर केलेली आहेत. तसेच सदर

प्रकरणी मा. तहसिलदार, सिल्लोड यांना केलेल्या विनंती नुसार त्यांनी काही शेतक-यांच्या जमिनीच्या ताब्याबाबत संबंधीत तलाठयांकडुन करवुन घेतलेल्या पंचनाम्यांनुसार शेतक-यांनी खरेदीखत करून दिलेल्या जमिनींचा ताबा श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांचेकडे नसुन त्या शेतक-यांकडेच असल्याचे निदर्शनास आले आहे. या वरून श्री. लक्ष्मण भिका विसपुते, रा. तळणी, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद हे बेकायदेशीर रित्या सावकारी करीत असल्याचे. स्पष्ट झाले आहे.

ज्या अर्थी गैरअर्जदार श्री लक्ष्मण भिका विसपुते यांनी उपरोक्त अहवालानुसार अवैध सावकारी करून अनेक शेतक-यांच्या जमिन खरेदीखताव्दारे गहाण खत करून घेतल्याचे आढळून आल्यामूळे घरझडती मध्ये आढळून आलेले खरेदीखतामधील संबंधिताचे म्हणणे व त्यावर गैरअअर्जदाराचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी संदर्भ क्र.७ अन्वये तक्रारी मधील गैरअर्जदार यांना लेखी / तोंडी म्हणणे मांडण्यासाठी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ कलम १८ नुसार दि.१७/११/२०१४, दि.२/१२/२०१४, दि.२२/१२/२०१४ व दि.९/१/२०१४ रोजी संबंधिताची सुनावणी घेण्यात आली.

ज्या अर्थी संदर्भ क्र.६ अन्वये श्रीमती यशेदाबाई कचरु दिवटे रा.धावडा ,ता.सिल्लोड यांनी दि.२२/१२/२०१४, रोजी सुनावणी वेळी लेखी म्हणणे तसेच दिनांक ३१.१२.२०१४, रोजी सुनावणीस हजर राहुन तोंडी म्हणणे सादर केले की,मी धावडा येथील रहिवासी असून व्यवसायाने शेती करीत आहे.सन २००५ मधे मला पैशाची गरज पडल्याने मी तळणी येथील खाजगी सावकार लक्ष्मण भिका विसपुते यांच्याकडून मुलीच्या लग्नासाठी रू.५०,०००/-(अक्षरी पन्नास हजार रूपये) दरमहा दरशेकडा १०% दराने व्याजाने घेतले होते. या रकमेस धर म्हणून मी त्यांना माझी गट नं.६७/१ मधील ३२ आर शेतजमिनीची रजिस्ट्री क्र.३९७१ दि.८/८/२००५ रोजी त्यांच्या नावाने लिहुन दिलेली होती .या रकमेवरील व्याजाच्या पैशाची परत फेड मी नियमीत पणे केलेली आहे.त्यानंतर मला पुन्हा विहिरीच्या कामासाठी पैशाची गरज पडल्याने मी पुन्हा सदर सावकार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांचेकडुन सन २००९ मध्ये रु.४००००/-अक्षरी चाळीस हजार दरमहा दरशेकडा १०% दराने व्याजाने घेतले होते.या पैशास धर म्हणुन मी सदर सावकार श्री.लक्ष्ममण भिका विसपुते यांच्या नावाने माझी धावडा शिवारातील गट नं.६४/१ मधील १ हे.१९ आर शेतजमिनीची रजिस्ट्री क्र.२६२४ दि.१७/६/२००९ रोजी परत पलटवून देण्याच्या तोंडी बोलीवर त्यांचे नावाने लिहून दिलेली आहे. सदर घेतलेल्या कर्जाच्या रक्कमेची व्यजासह परत करुनही जमीन पलटवून दिली नाही.ते सदरची जमीन परस्पर विकण्याची धमकी देत आहे.तोंडी बोलीनूसार रकमेची परतफेड झाल्यावर गहाण ठेवलेली शेतजमीन परत पलटवून देण्याबाबत ठरले होते.घेतलेली रक्कम कर्जाऊ म्हणून व्याजाने घेतलेली असल्याने रकमेस धर म्हणून जमीन त्यांच्या नावाने लिहून दिलेली असली तरी शेतजमीन माझ्याच ताब्यात होती व आहे. त्या जमिनीवर नियमितपणे मी पिक घेत आहे.ज्यावेळी हया शेतजमिनीचे खरेदीखत करण्यात आले होते,त्या खरेदीखतावर शासन नियमानुसार रक्कम टाकलेली होती.तथापि संपुर्ण रक्कम मी घेतलेली नव्हती. तसेच घेतलेल्या मुद्दल व व्याजाची रक्कम मी खरेदीखतावरील साक्षीदार श्री.उत्तम बाजीराव बनकर, श्री.नारायण भिका बनकर तसेच दुस-या खरेदीखतावील श्री.नंदु कचरु दिवटे व श्री.ईश्वर किसन पैठणे व सावकार यांचे नातलग गावातील श्री.ज्ञानेश्वर वामनराव भामरे व बॉन्ड पेपरवरील जवाब लिहुन देणार श्री.ईश्वर किसन पैठणे श्री.उत्तम बाजीराव बनकर,श्री.नारायण भिका बनकर हे होते. या व्याजाने घेतलेल्या रकमेवरील व्याज मी सन २०१३ पर्यंत त्यांना वेळोवेळी दिलेले आहे.जि शेतजमिन श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांच्या नावाने लिहुन दिलेली होती ती माझ्याच ताब्यात असल्याने त्या जमिनीतुन घेतलेल्या कापुस व मका पिकावर सदरचे व्याज मी त्यांना व्यवहारातील साक्षीदार ज्ञानेश्वर वामनराव भामरे व ईश्वर किसन पैठणे यांच्या हाताने दिलेले आहे.व माझ्या बचतीमधुन सन २०१४ मध्ये त्यांना मुद्दल रक्कम परत केलेली आहे.घेतलेल्या मुद्दल रकमेची व्याजासह परत फेड झालेली असल्याने मी त्यांना त्यांचे नावे लिहुन दिलेली शेतजमिन परत माझ्या नावांने पलटवुन देणे बाबत वेळोवेळी विनंती केली असता त्यांनी टाळाटाळ करुन माझी जमीन परत करुन दिली नाही.त्यानंतर गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते हे एक दिवस धावडा येथे आले व मझी तुमच्याकडे आनखी रक्कम बाकी आहे.ती द्या नाहीतर जमिन विक्री करुन टाकेल अशी धमकी दिली.त्यावेळी त्यांनी घेतलेल्या रकमेवर अवाच्या सव्वा व्याज लावुन व व्याजावरही व्याज लावुन रक्कम मागणी केली घेतलेल्या रकमे पोटी मी त्यांना रु.२५००००/-अक्षरी रुपये दोन लाख पन्नास हजार परत केलेले आहे.तदनंतर त्यांनी मला जमिन विक्री करण्याची धमकी दिल्याने माझा मुलगा नामे नंदु कचरु दिवटे व इतर पिडीत तक्रारदार

यांनी त्यांचे विरोधात अवैध सावकारी बाबत समाजीक कार्यकर्ते कल्याण सोपानराव सोनवणे यांच्या मार्फत तक्रार दिलेली होती .त्यानुसार या तक्रारीची चौकशी सहाय्यक निबंधक कार्यालयातील श्री. जैस्वाल यांनी केलेली आहे.तक्रारीनुसार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांचे घरी श्री.जैस्वाल यांनी घेतलेल्या घरझडतीत माझे व्यवहारा बाबत शेतजमिनीची रजीस्ट्री व माझ्या वडीलाच्या नावाचे कोरे चेक व काही नोंद वहया सापडलेल्या आहे.त्यामध्ये मी व्यजाने घेतलेल्या रक्कमेची नोंद आहे.तसेच या व्यवहारातील साक्षीदार यांना मी साक्षीसाठी हजर करेल सदर सावकार श्री.लक्ष्मण भिका विसपुते हे व्याजाने पैसे देण्याचा धंदा करतात व त्याबदल्यात ते शेतक-यांच्या को-या चेकवर सहया घेतात व जमिनी त्यांच्या नावाने करुन घेतात व जमिन विकण्याची धमकी देतात.त्यांनी धावडा, तळणी, शिंन्देंफळ, आमाठाणा, लिहा, पारध, चारनेरवाडी व उपळीवाडी येथिल लोकांशी सावकारी व्यवहार केला आहे.तसेच ब-याच लोकांना त्यांनी घेतलेल्या रक्कमेची मुद्यल व व्याजासह रक्कमेची परतफेड झाल्यावर शेतजमिनी पलटवुन दिलेल्या आहेत.त्यामुळे सावकारी कर्जाच्या मोबदल्यात गहाण खत करुन दिल्या बद्यल पुराव्यानिशी सिध्द होते.म्हणुन सदर चे वरील नमुद दोन्ही खरेदी खत रद्य करुन गहाण खत जाहिर करुन मला माझी जमिन परत करावी व तसेच माझे लेखी म्हणणे ग्राहय धरावे असे नमुद केले.

तसेच अर्जदार यांनी दिनांक २२/१२/२०१४, चे सुनावणी दरम्यान तोंडी म्हणणे मांडले की, मला २००५ मध्ये मुलीच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने मी रु.५००००/- व ४००००/-प्रति शेकडा १०% दराने व्याजाने घेतले होते व गट नं.६७ मधील ३२ आर व गट नं.६४/१ मधील १ हे १९ शेतजमिन गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांना खरेदी खत करुन दिलेली आहे. सदर जमीन ही मी त्यांच्याकडुन घेतलेल्या सावकारी कर्जाच्या मोबदल्यात गहाण खत करुन दिली आहे. तरी माझी वरील जमिन मला परत करावी.

ज्याअर्थी संदर्भ क्र.७ नुसार गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांनी दिनांक १७/११/२०१४ यांनी लेखी म्हणणे मांडले की, माझ्या गावापासुन धावडा हे ५ किलोमिटर असुन खरेदीखत क्र.३९७१ दिनांक ८/८/२००५ रोजी मी सर्व्हे नं.६७ पैकी ३२ आर जमीन मी श्रीमती यशोदाबाई कचरु दिवटे यांच्याकडुन कायम खरेदीखता आधारे विकत घेतलेली आहे.

तसेच दिनांक २२/१२/२०१४ रोजी तोंडी म्हणणे मांडले की,सदर शेतजमिन मी खरेदी करुन घेतली आहे त्याबद्यल त्यांना मी रोख रक्कम दिलेली आहे.फिर्यादी खोटा आरोप करीत आहे.तसेच साक्षीदार खोटे अरोप करीत आहे.मी जमिन घेत नव्हतो, मला स्वत:ची जमिन विकायला लावली व अर्जदार यांची जमिन घ्यायला लावली माझी मुलगी लग्नाची असुन मुलगा शिकत असुन यामुळे त्याची शाळा बुडाली तरी माझी जमिन परत जाऊ नये असे नमुद केले. त्यांनी इतक्या दिवस माझ्या विरोधात काही कार्यवाही का केली नाही व खरेदी खत रद्य करणेसाठी मा दिवाणी न्यायालयात दावे सुध्दा दाखल केलेला नाही. माझ्या विरोधात कसलाही कागदोपत्री पुरावा नसतांना मी बेकायदेशिर सावकारी व्यवसाय करतो असे म्हणुन माझ्या विरोधात खोटी नाटी तक्रार दिली आहे.सदर जमीन मी खरेदीखता आधारे विकत घेतलेली आहे. माझी जमिन परत जाऊ नये असे नमुद केले.

ज्याअर्थी संदर्भ क.३ नुसार चौकशी अहवालात नमुद प्रमाणे **,उक्त तक्रारीस अनुसरून** सदरचे खरेदीखत करते वेळी खरेदीखत करून देणारे श्रीमती यशोदाबाई कचरू दिवटे, नंदु कचरू दिवटे, व चंद्रकांत कचरू दिवटे यांच्यात शेतजमिन पलटवुन देणे बाबत आपसात तोंडी ठरलेले होते. संबंधीतांनी श्री. लक्ष्मण भिका विसपुते रा.तळणी यांचेकडुन सन २००५ मध्ये वैयक्तीक अडचन भागविण्यासाठी प्रत्येकी रू.५००००/- व रु. ४००००/-१० % महिना दराने व्याजाने घेतलेले होते व सदरची रक्कम मुद्दल व व्याजासह परत फेडीनंतर वरील जमिन पलटवुन देणे बाबत ठरलेले होते. वरील दोन्ही खरेदीखता मध्ये नमुद केलेली शेतजमिन ही व्याजाच्या रकमेपोटी आड म्हणुन ठेवलेली होती. खरेदी खत सावकारी व्यवहारात करण्यांत आलेले आहेत. प्रत्यक्ष खरेदीविक्रीचा व्यवहार झालेला नाही. व खरेदी विक्री प्रमाणे रक्कम अदा केलेली नाही. सदरची शेतजमिन प्रत्यक्ष श्रीमती यशोदाबाई कचरू दिवटे, यांच्याच ताब्यात आहे. व सदरच्या शेतजमिनी मधील खरेदीखताचा व्यवहार व्याजाने पैशास आड म्हणुन सावकारी व्यवहारातुन झालेला आहे. असा जवाब लिहुन दिलेला आहे.

OF MONEYLENDERS AURANGABAD

ह्या व्यवहारातील दुसरे साक्षदार श्री. नारायण भिका बनकर रा. धावडा यांनी दिनांक २१/०८/२०१४ रोजी जवाब लिहुन दिलेला आहे. तोच जवाब रू. १०० च्या बॉन्ड पेपरवर दोन साक्षीदारा समक्ष चौकशी अधिकारी यांचे समक्ष दिनांक २१/०८/२०१४ रोजी सादर केलाआहे. त्यात त्यांनी नमुद केले आहे की, त्यांनी सिल्लोड येथे दुय्यम निबंधक कार्यालयात नमुद नोंदणीकृत खरेदीखत मध्ये साक्षीदार म्हणुन सही केलेली आहे.

सदर प्रकरणी प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी सविस्तर चौकशी केलेली असुन चौकशी अंती चौकशी अधिकारी यांनी पुढील प्रमाणे चौकशी निष्कर्ष दिले आहे.या प्रकरणात ज्यांचे विरूध्द अवैध सावकारी बाबत तक्रार करण्यांत आलेली आहे, ते श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांचे तळणी, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद येथील राहत्या घराच्या दिनांक १४/०८/२०१४ रोजी घेण्यांत आलेल्या घरझडती मध्ये इतर शेतकऱ्यांचे सहया केलेले व न केलेले कोरे धनादेश,-२३ सहया केलेले व न केलेले कोरे बॉन्ड पेपर-१२ व्याजाने कर्जाऊ दिलेल्या रकमांच्या नोंदी असलेल्या-७ नोंद वहया, राष्ट्रीय बचतपत्र-१ जनावरांचे दाखले-३५ व शेतकऱ्यांच्या जमिनीची मुळ खरेदीखते -५१ व खरेदीखत कायम-४ इत्यांदी दस्ताऐवज आढळुन आलेले आहेत. तसेच त्यानुसार मा. तहसिलदार सिल्लोड यांनी सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन या प्रकरणी सत्वर कार्यवाही केली व संबंधीत तलाठी यांना सत्य परीस्थीतीचा पंचनामा सादर करण्याचे सांगीतले व प्राप्त दि.३०/८/२०१४ चे पंचनाम्यासह त्यांनी त्यांचे पत्र दिनांक ३०/८/२०१४ नुसार अहवाल सादर केला आहे. त्यांतील उपरोक्त नमुद १ ते १५ शेतकऱ्या पैकी खालील नमुद १ ते १५ शेतकऱ्यांच्या जमिनीचा ताबा संबंधीत जमिन खरेदीकरून घेणार यांचेकडे नसुन शेतजमिनीचा ताबा हा प्रत्यक्ष जमिनी खरेदी खत करून देणारे शेतकरी यांचेच ताब्यात आहे. त्यामध्ये अर्जदार श्रीमती यशोदाबाई कचरु दिवटे यांचाही समावेश आहे.त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | गावाचे नांव | खरेदी खताचे रेकार्डनुसार खरेदी करणाऱ्याचे नांव | खरेदी खताचे रेकार्डनुसार विक्री करणाऱ्याचे नांव | गट व एकुण क्षेत्र | पैकी प्रत्यक्ष जमिन ताबे दाराचे च कसनाराचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | धावडा | लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी | ईश्वर किसन पैठणे रा. धावडा | गट नं.४० क्षेत्र १ हेक्टर २३ आर | ईश्वर किसन पैठणे रा. धावडा |
| २ | धावडा | लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी | एकनाथ रतन गिरी रा. धावडा | गट नं.३२ क्षेत्र ८० आर | एकनाथ रतन गिरी रा. धावडा |
| ३ | धावडा | लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी | पांडुरंग फकिरा जाधवरा. धावडा | गट नं.३२ क्षेत्र ५ एकर ३० आर | संजय पांडुरंग जाधवरा. धावडा |
| ४ | धावडा | लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी | ज्ञानेश्वर वामनराव भांमरे रा. धावडा | गट नं.७/१ व ७/२ क्षेत्र १ हेक्टर ३० आर | ज्ञानेश्वर वामनराव भांमरे रा. धावडा |
| ५ | धावडा | लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी | एकनाथ तुकाराम दिवटे रा. धावडा | गट नं.२५ क्षेत्र १ हेक्टर ११ आर | एकनाथ तुकाराम दिवटे रा. धावडा |
| ६ | धावडा | लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी | नंदु कचरू दिवटे रा. धावडा | गट नं.६७ क्षेत्र ३५ आर | नंदु कचरू दिवटे रा. धावडा |
| ७ | धावडा | लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी | नंदु कचरू दिवटे रा. धावडा | गट नं.६७ क्षेत्र १४ आर | नंदु कचरू दिवटे रा. धावडा |
| ८ | धावडा | लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी | चंद्रकांत कचरू दिवटे रा.धावडा | गट नं.६७ क्षेत्र ९१ १/२ आर | चंद्रकांत कचरू दिवटे रा.धावडा |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | **धावडा** | **लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी** | **यशोदाबाई कचरू दिवटे रा. धावडा** | **गट नं.६७ क्षेत्र ३२ आर** | **यशोदाबाई कचरू दिवटे रा. धावडा** |
| १० | धावडा | शोभाबाई सोमनाथ वाणी रा. आमठाणा | यशोदाबाई कचरू दिवटे रा. धावडा | गट नं.६७ क्षेत्र ४२ आर | यशोदाबाई कचरू दिवटे रा. धावडा |
| ११ | **धावडा** | **लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी** | **यशोदाबाई कचरू दिवटे रा. धावडा** | **गट नं.६४/१ क्षेत्र १ हेक्टर १९ आर** | **यशोदाबाई कचरू दिवटे रा. धावडा** |
| १२ | तळणी | लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी | सांडुसिंग कचरू भोपळे रा. तळणी | गट नं.३५४ क्षेत्र ५३ आर | सांडुसिंग कचरू भोपळे रा. तळणी |
| १३ | तळणी | छायाबाई लक्ष्मण विसपुते रा. तळणी | नंदलाल विठ्ठल भोपळे रा. तळणी | गट नं.३५३ क्षेत्र १ .हेक्टर ४९ आर | नंदलाल विठ्ठल भोपळे रा. तळणी |
| १४ | तळणी | लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी | ब्रिजलाल आसाराम बेडवाल रा. तळणी | गट नं.२६६ क्षेत्र १ हेक्टर ४८आर | प्रेमसिंग हिरालाल भोपळे रा. तळणी |
| १५ | शिंन्देफळ | लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी | रघुनाथ महादु कावले रा. शिंन्देफळ | गट नं.२६५ क्षेत्र ५६ आर | रघुनाथ महादु कावले रा. शिंन्देफळ |

उपरोक्त प्रकरणी चौकशी अंती घेतलेले जाब जवाब मा. तहसिलदार यांचे जमिनीचे ताबे बाबतचा अहवाल व दिनांक १४/०८/२०१४ रोजी श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांचे राहते घरी घेतलेल्या घरझडतीत सापडलेल्या दस्तऐवजावरून चौकशी अंती ज्यांची खरेदीखते आढळुन आली त्यापैकी २५ शेतकऱ्यांनी व खरेदीखतांवरील साक्षीदारांनी ती खरेदीखते व्याजाने घेतलेल्या रक्कमेस आड म्हणुन करून दिल्याचे त्यांनी चौकशी अधिका-यांना दिलेल्या लेखी सोबात लिहुन दिलेले आहे.

तसेच पुढील पाच प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांनी श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांचेकडुन कर्ज घेऊन त्यांना जमिनीचे खरेदीखत करून दिले व त्या शेतकऱ्यांनी कर्जाची सव्याज परत फेड केल्या नंतर श्री. विसपुते यांनी त्यांच शेतकऱ्यांना अथवा त्या शेतकऱ्याच्या कुटुंबातील सदस्यांना त्याच जमिनी पलटवुन देण्या बाबतचे खरेदीखत करून दिलेले असल्याचेही सिध्द झालेले आहे.

तक्ता:-१

| अ.क्र | खरेदीखत क्र.व दि. | खरेदीखत करून देणार | व खरेदी खत करून घेणार | खरेदी खत करुन घेणा-याचे परत खरेदी खत खत करुन देणा-यासी नाते |
|---|---|---|---|---|
| १. | २४५६ दि.९/६/०९ | श्री.बाबुलाल शंकर बावस्कर रा.धावडा | श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा.तळणी | स्वत: |
| २. | १९६८दि.१९/४/०५ | श्री.कचरु संतु भोपळे रा.तळणी | श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा.तळणी | वडील |
| ३. | १६६० दि.१/४/०५ | श्री.दौलत बसी महेर रा.उपळीवाडी | श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा.तळणी | वडील |
| ४ | ३९६०दि.२/९/०४ | श्री.गणेश विठ्ठल भोपळे रा.तळणी | श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा.तळणी | भाऊ |
| ५ | ३६२८ दि.११/६/०१ | श्री.कडुबा बाबुराव वाघ रा.तळणी | श्रीमती छायाबाई लक्ष्मण विसपुते रा. तळणी | पती |

तक्ता:-२

| अ.क्र | खरेदीखत क्र.व दि. | खरेदीखत करून देणार | व खरेदी खत करून घेणार | खरेदी खत करुन घेणा-याने परत खरेदी खत करुन देणा-यासी नाते |
|---|---|---|---|---|
| १. | ३२९५ दि.१७/६/१४ | श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी | श्री.बाबुलाल शंकर बावस्कर | स्वत: |
| २. | १७१४,दि.१४/५/०८ | श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी | श्री.सांडुसिंग कचरूसिंग भोपळे | मुलगा |
| ३. | ३५०१ दि.२६/७/१० | श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी | श्री.पोपट दौलत महेर | मुलगा |
| ४ | २७३२ दि.२६/४/०५ | श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी | श्री.नंदलाल विठ्ठलसिंग भोपळे | भाऊ |
| | ४१८६ दि.२१/१०/१० | श्रीमती छायाबाई लक्ष्मण विसपुते रा. तळणी | श्रीमती मालताबाई कडुबा वाघ | पती |

तसेच सदर तक्रार अर्जात उल्लेख असलेले १) श्री.एकनाथ रतन गिरी रा.धावडा ता.सिल्लोड २) श्री.पांडुरंग फकिरा जाधव रा.धावडा ३) श्री. ज्ञानेश्वर वामन भामरे ४) श्री.एकनाथ तूकाराम दिवटे ५) श्री.नंदु कचरू दिवटे रा.धावडा ६) श्री.सांडु भोपळे रा.तळणी ७) श्री. नंदलाल विठ्ठल भोपळे रा.तळणी ८) श्री.बाबुलाल फुलसिंग रा.चारनेरवाडी) हे शेतकरी व त्यांच्या खरेदीखतावरील १) श्री.नंदु कचरू दिवटे रा.धावडा २) ज्ञानेश्वर वामनराव भामरे रा.धावडा साक्षीदारांनी प्रत्येकी रू.१०० च्या बॉन्डवर श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांनी व्याजाने पैसे दिल्या बाबतची शपथपत्रे सादर केलेली आहेत.तसेच सदर प्रकरणी चौकशी अधिकारी यांनी मा. तहसिलदार, सिल्लोड यांना दि.२६/८/२०१४ व दि.५/९/२०१४ नुसार केलेल्या विनंती नुसार त्यांनी १) श्री.ईश्वर किसन पैठणे २)श्री.एकनाथ रतन गिरी ३) श्री.पांडुरंग फकिरा जाधव (मयत) ४) श्री.ज्ञानेश्वर वामन भामरे ५) श्री.एकनाथ तूकाराम दिवटे ६) श्री.नंदू कचरू दिवटे तसेच नंदू कचरू दिवटे , श्री.चंद्रकांत कचरू दिवटे,यशोदाबाई कचरू दिवटे यांच्या जमिनी गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांनी परस्पर दुस-यांस विकलेल्या जमिनीच्या ताब्याबाबत संबंधीत तलाठयांकडुन करवुन घेतलेल्या पंचनाम्यांनुसार शेतकऱ्यांनी खरेदीखत करून दिलेल्या जमिनींचा ताबा श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांचेकडे नसुन त्या त्या शेतकऱ्यांकडेच असल्याचे तलाठी यांचा दि.३०/८/२०१४ चा पंचनामा अहवालात निदर्शनास आले आहे. त्यामध्ये अर्जदार श्रीमती यशोदाबाई कचरु दिवटे यांचेही सदर शेताचा पंचनामा दि.३०/८/२०१४ नुसार ताबा व पिक पेरा असल्याचे आढळून आले आहे.

उपरोक्त बार्बीवरून वरून श्री. लक्ष्मण भिका विसपुते, रा. तळणी, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद हे बेकायदेशीर रित्या सावकारी करीत असल्याचे चौकशी अंती स्पष्ट दिसुन येते.त्याबाबत गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिकाजी विसपुते यांना चौकशी अधिकारी यांनी म्हणणे मांडण्याची संधी दिलेली आहे. त्यांनी चौकशी अधिकारी यांचेसमोर दि.२८/८/२०१४ रोजी तसेच सुनावणीमध्ये या कार्यालयानेही दि.१७/१०/२०१४ व दि.२/१२/२०१४ रोजी नोटीस देवून त्यांचे सदर व्यवहाराबाबत म्हणणे मांडण्याची १७/११/२०१४,दि.२/१२/२०१४ व दि.२२/१२/२०१४ चे सुनावणीमध्ये संधी दिलेली आहे.

अर्जदार, श्रीमती यशोदाबाई कचरु दिवटे रा.धावडा ता.सिल्लोड यांनी तक्रारीत नमुद केलेल्या बाबी व त्या अनुषंगाने चौकशी अधिकारी यांचा इत्यंभूत चौकशी अंती सादर केलेला दि.२५/९/२०१४ रोजीचा चौकशी अहवालातील निष्कर्ष गैरअर्जदाराच्या वतीने सादर केलेला खुलासा व या कार्यालयातील सुनावणी दिनांक १७/११/२०१४, दि. २/१२/२०१४ आणि दि.२२/१२/२०१४ रोजीचे सुनावणी दरम्यान मांडलेले तोंडी व लेखी म्हणणे,अर्जदार श्रीमती यशोदाबाई कचरु दिवटे यांचा ३२ आर व १ हे. १९ आर जमीनीचा अर्जदाराचा प्रत्यक्ष ताबा विचारात घेता पुढील बाबी निदर्शनास येतात

१) गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांचे तळणी येथे दि.१४/८/२०१४ रोजी घेतलेल्या घरझडती मध्ये सापडलेले आक्षेपार्ह दस्तऐवज जसे १) कोरे सहया असलेले बॉन्ड -१२ २) कोरे धनादेश -२३ ३) बँक पासबुक -६ ४) राष्ट्रीय बचतपत्र-१ ५) नोंदणी व सुट्टे कागद-१९ ६) नोंदवहया -७ ७) जनावराचे दाखले-३८ ८) खरेदी खत-५१ ९) उसनवार पावती-४ १०) खरेदीखत कायम-४ इ.कागदपत्र तसेच उपरोक्त जमीन खरेदी विक्री व्यवहारापैकी गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांनी

खरेदी केलेल्या जमिनी ५ परत त्याच व्यक्तींना पुन्हा सदर जमीन परत करणे यावरुन सदरचे खरेदी व्यवहार सावकारी संदर्भाने सदर जमीन खरेदीखत प्रतिभुती होती हे तक्रारदाराचे म्हणण्यास पुष्ठी देणारे आहेत.

सबब अर्जदार श्रीमती यशोदाबाई कचरु दिवटे मौजे धावडा शिवारातील गट नं.६७ मधील ३२ आर व ६४/१ मधील १ हे. १९ आर जमीन गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांचे नावांवर असुन सदर जमिनीचा ताबा अर्जदार श्रीमती यशोदाबाई कचरु दिवटे यांचे कडे असल्याचे आढळुन आल्यामुळे सदर जमीन मुळ विक्रीदार श्रीमती यशोदाबाई कचरु दिवटे यांनी सावकारी पोटी गहाण ठेवलेली आहे म्हणून सदर खरेदीखत अवैध ठरवुन ती जमीन त्यांच्या नावाने परत करणे ही बाब जमिनीचा प्रत्यक्ष ताबा अर्जदाराकडे असल्यामुळे अर्जदाराचे बाजुने आहे. म्हणुन सदर खरेदीखत क्र.३९७१/२००५ दि.८/८/२००५ व खरेदीखत क्र.२६२४/२००९ दिनांक १७/६/२००९ हे सावकारीच्या ओघात प्रतिभुती म्हणुन दिले असल्याची माझी खात्री झाली आहे.त्यामुळे सदर खरेदी खतामधील मौजे धावडा येथील गट नं. ६७ मधील ३२ आर जमीनीचे खरेदीखत क्र.३९७१/२००५ दि.८/८/२००५ व ६४/१ मधील खरेदीखत क्र.२६२४/२००९ दि.१७/६/२००९ मधील क्षेत्र १ हे. १९ आर जमीन अवैध असल्याचे जाहीर करुन अर्जदार मुळ मालक हस्तांतरण करणारे श्रीमती यशोदाबाई कचरु दिवटे यांना परत करणे करीता पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

मी, एन.व्ही.आघाव, सावकारांचे निबंधक तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद ; महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ (२) नुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते, रा.तळणी, ता.सिल्लोड यांना मौजे धावडा शिवारातील गट नं.६७ मधील ३२ आर व गट नं.६४/१ मधील १ हे. १९ आर जमीनीचे करुन दिलेले खरेदीखत क्रमांक ३९७१/२००५ दिनांक ०८/०८/२००५ व खरेदीखत क्र.२६२४/२००९ दिनांक १७/६/२००९ महाराष्ट्र सावकारी (नियमन ) अधिनियम २०१४ चे कलम १८ (२) अन्वये अवैध असल्याचे घोषित करण्यात येत आहे आणि सदर खरेदीखतामधील जमीन अर्जदार हस्तांतरणकार मुळ मालक श्रीमती यशोदाबाई कचरु दिवटे यांना परत करण्यात येत आहे. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ (६) नुसार, संबंधीत सक्षम अधिकारी यांनी या आदेशाच्या अंमलबजावणींतर्गत सदर जमीनीचा तसा फेरफार करावा.

सदर आदेश आज दिनांक १२ /०२/२०१५ रोजी माझी सही व कार्यालयाच्या मुद्रेसह पारीत केला आहे.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD

(एन.व्ही.आघाव)
सावकारांचे जिल्हा निबंधक
तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था औरंगाबाद

**प्रत -**

१.मा.उप विभागीय अधिकारी सिल्लोड यांना पुढील कार्यवाहीस्तव माहितीस्तव.
२.मा.तहसिलदार सिल्लोड यांना योग्य त्या पुढील कार्यवाहीस्त देण्यात येते.
३.तलाठी सजा चारनेर ता.सिल्लोड यांना देऊन कळविण्यात येते की,उक्त प्रकरणात योग्य ती कार्यवाही करावी.
४. सहाय्यक निबंधक ,सहकारी संस्था, सिल्लोड यांना त्यांचा चौकशी अहवाल दि.२५/९/२०१४ च्या संदर्भात

**प्रत माहितीस्तव सविाय सादर.-**

१.मा.सहकार आयुक्त व निबंधक ,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे
२.मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद

सावकारांचे जिल्हा निबंधक
तथा जिल्हा उपनिबंध
सहकारी संस्था औरंगाबाद